# True Credits Private Limited

## E-NACH घोषणा - अटी आणि नियम

**दस्तऐवज क्रमांक: TC-ENDTC**

## दस्तऐवज तपशील

| विवरण | तपशील |
|---|---|
| शीर्षक | E-NACH घोषणा/अटी व नियम |
| वर्गीकरण | सार्वजनिक |
| वर्णन | E-NACH घोषणा/अटी व नियम |
| अभिरक्षक (कस्टोडियन) | कायदेविषयक, अनुपालन आणि नियामक व्यवहार विभाग |
| मालक | कायदेविषयक, अनुपालन आणि नियामक व्यवहार विभाग |

1. ज्या बँकेचे खाते डेबिट करण्यासाठी अधिकृत करत आहात, त्या बँकेच्या धोरणानुसार नियुक्त बँकेकडून एक वेळ आदेश नोंदणी शुल्का (जर असेल तर)च्या डेबिटसाठी तुम्ही सहमत आहात.

2. तुम्ही मान्य केलेल्या आणि अधिकृत केलेल्या सूचनेच्या आधारे, तुम्ही तुमचे नियुक्त बँक खाते डेबिट करण्यासाठी ट्रू क्रेडिट्स ला अधिकृत करत आहात.

3. हा e-NACH आदेश, तुमच्या ट्रू क्रेडिट्स कर्ज खात्याशी लिंक केलेल्या तुमच्या नियुक्त बँक खात्यातून निधी डेबिट करण्यासाठी तुमच्याकडून ट्रू क्रेडिट्सला ऑटो डेबिटसाठी एक अधिकृतता आहे. ही सुविधा ट्रू क्रेडिट्सच्या अशा सर्व ग्राहकांना दिली जाईल, ज्यांची बँक खाती, अशा नोंदणीकृत/NPCI (नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) सोबत भागीदारी असलेल्या बँकांमध्ये आहेत, ज्या e-NACH आदेश निर्माण करण्याच्या अशा सेवा देतात.

4. e-NACH आदेशाची निर्मिती केवळ तुम्ही निवडलेल्या निवडीच्या निकषांवर आधारित आहे. तुम्ही निवडलेल्या/अधिकृत केलेल्या स्थायी सूचना, विविध टाइमलाइनमध्ये निवडल्या जाऊ शकतात, जसे की (a) साप्ताहिक; (b) मासिक; (c) एक आड एक महिने; (d) त्रैमासिक; (f) सहामाही; किंवा वार्षिक (जसे लागू असेल). NACH आदेश ऑटो डेबिटची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी तुमच्याकडे तुमच्या नियुक्त बँक खात्यात पुरेसा निधी नसल्यास, कृपया ट्रू क्रेडिट्सच्या ग्राहक समर्थन टीमशी संपर्क साधा.

5. तुम्ही ज्या बँकेकडे तुमचे नियुक्त बँक खाते आहे, त्या बँकेला विनंती करून तुमच्याकडे कधीही e-NACH आदेश रद्द करण्याचा पर्याय आहे. कर्जाची थकबाकी असताना, 30 दिवसांची पूर्वसूचना ट्रू क्रेडिट्सला लिखित स्वरूपात दिल्याशिवाय, तुम्ही तुमचे बँक खाते बंद करू शकत नाही किंवा e-NACH /इतर आदेश काढून घेऊ शकत नाही आणि असे बँक खाते बंद झाल्यास, तुम्ही ट्रू क्रेडिट्सद्वारे निर्देशित केलेल्या e-NACH /अन्य आदेशासाठी योग्य पर्याय निवडाल. कृपया लक्षात घ्या की, e-NACH आदेशाचे असे अनधिकृत विद्ड्रॉल, पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टम्स अॅक्ट 2007 च्या कलम 25 चे उल्लंघन आहे आणि ते, कायदेशीर कारवाईसाठी जबाबदार आहे.

6. NPCI आणि RBI च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कोणतेही कायदेशीर किंवा प्रक्रियात्मक परिणाम टाळण्यासाठी, संकलनाच्या वेळी, तुमच्या नियुक्त बँक खात्यात पुरेसा निधी नेहमीच राहील याची खात्री करा. पुढे, तुमच्या बँक खात्यातील अपुऱ्या शिलकीमुळे ऑटो डेबिट अयशस्वी झाल्यास, तुमची बँक त्यासाठी बँकेच्या लागू धोरणानुसार बाऊन्सिंग शुल्क आकारू शकते. हे शुल्क आकारण्यात ट्रू क्रेडिट्सची कोणतीही भूमिका नाही. अधिक तपशील जाणून घेण्यासाठी कृपया तुमच्या बँकेची शुल्क पुरवणी तपासा.

7. ट्रू क्रेडिट्सद्वारे कोणतेही बाऊन्सिंग शुल्क आकारले जात नाही, तथापि, जर थकबाकीची रक्कम देय तारखेला भरली गेली नाही तर, ट्रू क्रेडिट्सद्वारे ग्राहकांकडून दंडाचे शुल्क आकारले जाईल.

8. अशा सेवा देणाऱ्या बँकांची यादी, NPCIच्या वेबसाइट (www.npci.org.in)वर वेळोवेळी अपडेट केली जाईल. NPCI कडे नोंदणीकृत/तिच्यासोबत भागीदार असलेल्या बँकांची यादी, NPCI च्या विवेकबुद्धीनुसार, कोणतेही कारण न देता, कधीही सुधारित केली/बदलली जाऊ शकते. ट्रू क्रेडिट्स, स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार, कोणत्याही संचालनविषयक (ऑपरेशनल) गैरसोयींच्या बाबतीत, e-NACH आदेश निर्मिती सेवा देणाऱ्या बँकांच्या यादीत वेळोवेळी फेरफार/बदल करू शकते. ट्रू क्रेडिट्सने तिच्या प्लॅटफॉर्मवर NACH आदेश सेवा देऊ करणाऱ्या बँकांच्या यादीत फेरफार केल्याच्या कोणत्याही परिस्थितीत, ट्रू क्रेडिट्स, ग्राहकांना त्याबद्दल सूचित करेल.

9. बँका त्यांच्या स्वतःच्या वैधता आणि अंतर्गत प्रक्रियेच्या आधारे असा कोणताही e-NACH आदेश नाकारू शकतात, जो ट्रू क्रेडिट्सच्या नियंत्रणात नाही. ट्रू क्रेडिट्स, संवाद साधण्यासाठी किंवा अशा नाकारल्या जाणाऱ्या कोणत्याही परिणामी दाव्यांसाठी किंवा तक्रारींसाठी जबाबदार नाही.

10. तुम्हाला हे समजले आहे की, तुम्हाला जिथे डेबिट अधिकृत करण्यात आले आहे त्या ट्रू क्रेडिट्सला रद्द करण्याची/दुरुस्त करण्याची विनंती योग्यरित्या कळवून, तुम्हाला हा आदेश रद्द/दुरुस्त करण्याचा अधिकार आहे.

11. उक्त e-NACH बाबत काही प्रश्न असल्यास, ग्राहक, ट्रू क्रेडिट्सच्या ग्राहक समर्थन संघाशी संपर्क साधू शकतो/शकते.